स.क्रि. के.नं. २७/२०२६

Cri.M.A.27/2026
Exh. 6/C

मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो, कागल

यांचे कोर्टात. . .

Order
Before me

J.M.F.C
30.07.2026

श्री. पांडूरंग कृष्णा पाटील - फिर्यादी

विरुद्ध

श्री. विलास श्रीपती चौगले, वगैरे - आरोपी

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2026.07.30 18:16:18 +0530

यातील फिर्यादी तर्फे साक्षीदार यांचे शपथपत्र

## ॲफिडेव्हिट

**मी फिर्यादी तर्फे साक्षीदार माझे नाव श्री. गजानन लहू कांबळे, वय ६० वर्षे, धंदा- शेती, रा. कुरुकली, ता. कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर शपथपत्र करतो की,**

१) मी वरील पत्यावरचा कायमचा रहिवाशी असून मला फिर्यादी, आरोपी माहितीचे आहेत.

२) मी फिर्यादीकडे त्यांच्या घरच्या शेतीच्या कामावर मजुर म्हणून वारंवार जात असतो. त्यामुळे मला फिर्यादीची व आरोपीची पुर्ण माहिती असून आरोपी हा वारंवार फिर्यादीस या ना त्या निमित्ताने त्रास देतात हे मी प्रत्यक्ष पहात आहे.

३) फिर्यादीचा मौजे कुरुकली, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील गट नं. ४१६ व ४२२ आहेत. या मिळकतीस लागून आरोपी विलास श्रीपती चौगले याची शेत

Asstt. Supdt.

जमिन आहे. आरोपी नं. १ चा आरोपी नं. २ अशोक विठ्ठल पाटील हा पाहुणा आहे व आरोपी नं. ३ हा आरोपी नं. १ चा मुलगा आहे. सदर आरोपी फिर्यादी यांना या ना त्या निमित्ताने शेतातील बांधाच्या कारणावरुन वाद करुन त्रास देत असतात हे मी पाहिले आहे. तसेच सदर आरोपींनी फिर्यादीची असलेली त्यांचे शेतातील पाईपलाईन फोडली आहे ते मी पाहिले आहे. सदरच्या पाईप फोडलेबाबत फिर्यादी यांनी आरोपी यांना विचारताना आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ केलेचे मी पाहिले आहे. सदर आरोपीनी फिर्यादीची पाईप लाईन फोडलेबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाणा मुरगुड येथे तक्रारी दिलेल्या आहेत ते मला फिर्यादीकडून समजले आहे.

४) आरोपींनी यापुर्वीही फिर्यादीचे वरील गट नंबरमध्ये सन २०२५-२६ च्या गळीत हंगामामध्ये कारखान्याला ऊस पाठविणेस देखील मज्जाव केला व ते विचारत असताना भांडण काढलेचे मी पाहिले आहे.

५) फिर्यादी यांन आरोपी विरुद्ध मे.कोर्टात फिर्याद दाखल केली आहे ती वस्तुस्थितीप्रमाणे दाखल केली आहे हे मला माहिती आहे.

म्हणून केले शपथपत्र आज मुक्काम गारगोटी

दिनांक २७/०७/२०२६ मे. जा. व्हावे

गारगोटी,

मी ॲफिडेव्हिट करणार यास ओळखतो

**(ॲड. एस. बी. पाटील)**

**Asstt. Supdt.**

## प्रतिज्ञा

मी ॲफिडेव्हिट करणार सत्य प्रतिज्ञा करतो की, वर नमुद व्हेरिफिकेशन मधील सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी दिनांक २७/०७/२०२६

[illegible]

Solemnly Affirmed before me by
Shri. Gajanan Lahu Kamble age 60
of R/o Kumbhali Tal. Kagal Kolhapur
who is identified by
Shri. Adv. S. B. Patil
whom I know personally
Date- 27/7/26

**Asstt. Supdt.**

The contents of the affidavit
are readover and explained
to the deponent in marathi and
he/she admit it to be true and
correct.

Asstt. Supdt.